INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# बदलते सामाजिक संदर्भ आणि जयंत पवारांची महानगरीय कथा
## (Changing Social Context and Jayant Pawar's Metropolitan Story)

**डॉ. भाऊसाहेब मु. नन्नवरे**

सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग
के. एम. सी. महाविद्यालय,
खोपोली, जि.रायगड (महाराष्ट्र)
E-mail: nannawareb@yahoo.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2021-63544528/IRJHIS2112006

***सारांश :***

*मराठी साहित्य परंपरेतील नव्या पिढीचे **नाटककार, कथाकार व पत्रकार म्हणून जयंत पवार** परिचित होते. १९८५ पासून त्यांनी विविध मासिके व नियतकालीकातून पत्रकार म्हणून काम केले. जयंत पवार यांच्या नाट्य व कथालेखनाला समकालीन जीवनातले अनेक पैलू आहेत.महानगरातले विविध स्वरूपी वास्तव त्यांनी आपल्या कथालेखनातून मांडले आहेत. वास्तव चित्रणातून मानव्याचा शोध घेण्याची तीव्र लालसा त्यांच्या लेखनात दिसते. ताणतणाव, मानवी जगण्याचा संघर्ष व माणूसपणाचा शोध असे विषय त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहेत. अनेक प्रकारची आशय सूत्रे व अनुभवक्षेत्रे त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेली आहेत. मध्यमवर्गीय माणसांचे जग, त्यांचे प्रश्न, चाळ संस्कृतीचे प्रभावी चित्रण जयंत पवार यांनी मांडले आहेत. ऑगस्ट २०२१ मध्ये त्यांचे निधन झाले.जयंत पवार यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कथा लेखनाचा सामाजिक संदर्भात घेतलेला हा वेध.*

**प्रस्तावना**( Introduction):

साहित्य आणि समाज या दोन संकल्पना अनेक अर्थाने परस्परांशी संबंधित आहेत. साहित्याचा समाजाशी असलेला परस्पर संबंध लक्षात घेता साहित्याचा सामाजिक अंगाने अभ्यास करणे आवश्यक ठरते. साहित्यकृती ही जीवनाच्या विविध अंगावर प्रकाश टाकते. स्वातंत्र्योतर काळातसर्वच अंगाने समाजजीवन बदलत गेले.नव्या साहित्यप्रवाहांना त्यातून प्रेरणा व दिशा मिळाली. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, अदिवासी, महानगरीय व विज्ञान अशा साहित्य प्रवाहांद्वारे सकस व गुणवत्तापूर्ण साहित्यनिर्मितीने मराठी साहित्य विकासात मोलाची भर घातली. गेल्या २०-२५ वर्षात देशाच्या आणि राज्याच्या एकूण वास्तवात अनेक महत्वाचे बदल झाले. सामजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक अशा सर्वच दृष्टीने परिवर्तनशील व स्थित्यंतराचा हा काळ आहे. मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार, त्यातून उदयाला आलेला नवमध्यम वर्ग, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन, अस्तित्वासाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा,

तडजोड या सर्वांमधून अनेक प्रश्न निर्माण झाले.मराठी साहित्यातील समकालीन साहित्यप्रवाह व प्रकारांमधून या प्रश्नांचा, जाणिवांचा व वास्तवाचा आविष्कार कसा घडतो आहे, हे अभ्यासाने महत्वाचे ठरते.

**नव्वदोत्तरी कथालेखनातील महानगरीय जाणीव -**

इ.स. १९९० नंतरची समाजरचना गुंतागुंतीची, विज्ञान-तंत्रज्ञानाने, माध्यम तंत्राने, संगणक व प्रसारमाध्यमांनी प्रभावित झालेली आहे. साहित्याचा अभ्यास करताना अनेक अंगाने त्याचा विचार करता येतो. किंबहुना तो करावाच लागतो. महानगरीय संवेदना, जाणिवा, त्यातून निर्माण झालेल्या महानगरीय वास्तवाचा, जाणिवांचा विचार समाजशास्त्रीय दृष्टीने केला पाहिजे. 'महानगर' ही संकल्पना आधुनिक आहे. भौतिक सुविधा, पक्के रस्ते, गगनचुंबी इमारती, वैभव संपन्नता ही लक्षणे येथे आढळतात. महानगर हे बहुरंगी महाकाय लोकसमूहाचे ते वास्तव असते. येथील जीवन वास्तवाचे, प्रश्न व समस्यांचे, संघर्षाचे स्थलकाल मिश्रित असे चित्रण महानगरीय साहित्यातून येते. कविता, कादंबरी, नाटक, याबरोबरच 'महानगरीय कथा साहित्य' हा एक महत्त्वाचा आविष्कार आहे, असे म्हणता येईल. १९९० नंतरच्या महानगरीय कथालेखनाचा विचार करता जयंत पवार, पंकज कुरुलकर, सतीश तांबे, विजय तांबे, समर खडस, मनस्विनी लता रवींद्र आणि शिल्पा कांबळे हे कथाकार महानगरीय जाणिवेची कथा लिहिताना दिसतात.

प्रस्तुत शोधनिबंधातून जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' व 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' या दोन कथासंग्रहातील कथालेखनाचा विचार केला आहे. १९८८-८९ पासून दिवाळी अंकांमधून जयंत पवार यांच्या कथा प्रसिध्द झाल्या आहेत. त्यात मात्र नियमितता व सातत्य नव्हते. या बाबत स्वतःच जयंत पवार म्हणतात, "त्या काळात मी कथालेखनाविषयी विशेष गंभीर नव्हतो. २००२ सालानंतर जे मी कथालेखन केले आहे ते या साहित्य प्रकाराची शक्तिस्थानं, मर्यादा लक्षात घेऊन. त्यात रंगून जाऊन."

**महानगरीय संवेदनेची कथा -**

जयंत पवार यांच्या **'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर'**(२०१०) व **'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा'**(२०१५) मधील कथांबाबत विवेचन करताना त्यातील अनुभवविश्व, जीवन जाणिवा, व्यक्तिचित्रण, निवेदन व भाषाशैली हे घटक केंद्रस्थानी ठेवले आहेत. त्यांच्या या दोनही कथासंग्रहातील कथांचा भौगोलिक अवकाश हा प्रामुख्याने महानगर आहे. त्यादृष्टीने पवारांची कथा ही 'महानगरीय संवेदनेची कथा' आहे. गंभीर व सकस नाटकं लिहिणारा नाटककार अशी जयंत पवार यांची ओळख आहेच, पण त्याचबरोबर अभिव्यक्तीचा अस्सलपणा टिकवून ठेवत महानगरातील जीवनवास्तवाला परिणामकारकतेने साकारण्यात जयंत पवारांचे योगदान महत्वाचे ठरते. आपल्या कथालेखनातून मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे प्रश्न ते मांडतात. गिरणी कामगारांच्या संघर्षाचे संदर्भ या कथांमधून व्यक्त होतात. या कथांचे अवलोकन करताना त्यातील संवेदनशीलता, भाषिक अभिव्यक्ती आणि पात्रांची सामाजिक पार्श्वभूमी हे गुणविशेष भाऊ पाध्ये यांचा कथालेखनाशी वारसा सांगणारे आहेत, आहे म्हणता येईल.

'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर'हा२०१० साली प्रकाशित झालेला जयंत पवार यांचा पहिला व 'साहित्य

अकादमी' पुरस्कार प्राप्त कथासंग्रह आहे, तर 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' हा २०१५ साली प्रकाशित झालेला संग्रह होय. त्यात अनुक्रमे सात आणि पाच कथा आहेत. जयंत पवारांच्या कथांमध्ये महानगरातील माणसांची होणारी मानसिक कोंडी, हिंसाचार, सततची धावपळ व जगण्यासाठी चाललेली धडपड तसेच श्रमजीवी वर्गांच्या हालअपेष्टा, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, मुंबईतील बकाल जीवनचित्रण ही आशयसूत्रे दिसतात. आपल्या कथा लेखनामागील प्रेरणा सांगताना जयंत पवार म्हणतात,

"मी आयुष्याची तीस-बत्तीस वर्ष जिथे घालवली तो गिरणगाव, नाटकवाल्यांचं जग, साहित्यिकांचं जग, पत्रकारितेच्या निमित्ताने जगाकडे बघायची खुली झालेली खिडकी, मुंबईतला गिरण्यांचा संप, बाबरीकांड, धार्मिक पुनरुज्जीवनवाद आणि जातीय दंगे, जागतिकीकरणाचे भलेबुरे आघात या सगळ्याचा परिणाम माझ्या जाणिवांवर आणि पर्यायाने लेखनावर झालेला आहे". मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे दुःख मांडतानाच गिरणी कामगारांचा प्रश्नांना वाचा फोडणारी जयंत पवारांची कथा आहे. कामगारांचे संप, संघटनांच्या भूमिका, अंतर्गत दुही याचे चित्रण त्यांचा 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'एका रोमहर्षक लढ्याचा गाळीव इतिहास' या कथांमधून येते. गिरणगावच्या बदलत्या रुपात उपरा ठरलेला कामगार, त्याचा संघर्ष याचे चित्रण वास्तव रुपात व्यक्त झाले आहे. 'साशे भात्तर रुपयांचा सवाल अर्थात युद्ध आमचे सुरु !' या त्यांच्या कथेतून कामगारांमध्येच परस्पर संघर्ष पेटवून देऊन संघटना शक्ती संपवून टाकण्याचे गिरणी मालकांचे षडयंत्र व्यक्त झाले आहे.

**जयंत पवार यांच्या कथालेखनातील जीवनानुभव -**

१९९० नंतर जागतिकीकरणाची एक मोठीच लाट आली. मध्यम व नवमध्यम वर्गसमूह त्यातून तयार झाला.पैसा हाच सुखी जीवनाचा मंत्र मानला जाऊन त्यासाठी सततचा संघर्ष व स्पर्धा सुरु झाली. स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी वाटेल ती तडजोड, अर्थकेंद्री जीवनव्यवहार त्यातून अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण झाले. या सर्व घटना-घडामोडी ही जयंत पवारांच्या कथेची प्रेरणा आहे. महानगरातील हे वास्तव, संवेदना, बदलते संदर्भ त्यांच्या कथेतून व्यक्त होतात. मुंबईत झालेले बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया, स्त्रियांवरील अत्याचार, भाषिक व धार्मिक प्रश्नांवरून झालेले वाद इ. संदर्भ जयंत पवार यांच्या कथेतून येतात. या सर्व परिस्थितीत सामन्य माणूस हा भयभीत झाला असून त्याची ही असुरक्षितता 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन' या कथेतून व्यक्त होते.जयंत पवारांच्या कथेतून 'नैतिकता' या मूल्यसंकल्पनेवर प्रकाश टाकला गेला आहे. नैतिकतेच्या समाजमान्य संकल्पना आणि नव्या व्यवस्थेत निर्माण झालेली 'नैतिकता' यांच्यातील संघर्ष पवारांच्या कथेतून अधोरेखित होतो. योग्य-अयोग्य, पाप-पुण्य, नीती-अनीती यांच्यातील अंतर्विरोध व त्यातून माणसांच्या मनाची होणारी कोंडी नेमक्या स्वरुपात मांडली गेली आहे. जयंत पवार यांच्या 'छटाकभर रात्र तुकडा-तुकडा चंद्र' व 'चंदूच्या लग्नाची गोष्ट अर्थात सडुम मे टढढूम' या कथांमधून ही आशयसूत्रे व्यक्त होतात.

**कथालेखनाचे विशेष -**

समकालीन सामजिक वास्तव व त्यातील बदलते संदर्भ यांना आपल्या लेखनाच्या आशयसूत्रांशी जयंत पवार यांची कथा थेटपणे जोडून घेते. महानगरात घडणाऱ्या भयावह वास्तवाची जाणीव त्यांच्या कथांमधून व्यक्त

होते. जागतिकीकरणाचे भयावह रूप हे आशयसूत्र अनेक कथांमध्ये आहे. कौटुंबिक पातळीवरील परस्पर संघर्ष, आंतरिक ताणतणाव, चंगळवादी संस्कृती, महानगरातून उखडल्या गेलेल्या कामगारांचे भावविश्व, त्यांचे संसार अशा विविधांगी जाणिवा व बदलत्या सामाजिक संदर्भाचे सूत्र जयंत पवारांच्या कथेतून येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कथाकार जयंत पवार हे भोवतालच्या घटनांचा केवळ वेध घेत नाहीत, तर मानवी जीवनाच्या संदर्भात या बदलत्या सामाजवास्तवाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न ते करतात. आयुष्याची ३०-३२ वर्ष या महानगरात घालवल्यामुळेच त्याकडे बघण्याची एक नेमकी दृष्टी त्यांचाकडे दिसते. हिच त्यांच्या कथा लेखनाची विशेष ताकद असे म्हणता येईल.

समकालीन मराठी कथेत जीवनचित्रण, व्यक्तिरेखा, निवेदन,समाजवास्तव, भाषाशैली याबाबतीत जे विविध प्रयोग झाले, त्यात जयंत पवार यांच्या कथालेखानातील वैशिष्ट्यांची नोंद घ्यावी लागते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि विशेषतः महानगरातील बदलत्या संदर्भांना आपल्या कथाविश्वातून चिंतनशील प्रतिसाद त्यांनी दिला. रचनापद्धती, निवेदन शैली याबाबत नाविन्यपूर्ण मांडणी जयंत पवार यांच्या कथेत दिसते. कथेतील पात्र साकारण्यात, कथा निवेदनात पवार यांनी काही पारंपारिक संकेत वापरले तर काही ठिकाणी निवेदनाचा, भाषाशैलीचा वेगळा प्रकारही त्यांनी वापरला आहे. उदा. 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन, 'जन्म एक व्याधी', छटाकभर रात्र तुकडा-तुकडा चंद्र', या कथांमधून बेभरवशाचा निवेदक वाचकांशी संवाद साधतो.

**सारांश-**

महानगरातील बदलत्या समाजजीवनाचे भयावह वास्तव, त्यासंबंधीच्या जाणिवा जयंत पवार यांच्या कथा लेखनातून जाणवतात, ही आजच्या मराठी कथेसंदर्भात महत्वाची घटना आहे. भाऊ पाध्ये यांच्या नंतर महानगरीय जाणिवेची कथा लिहिणारा, ती परंपरा जोपासणारा एक महत्वाचा कथाकार म्हणून जयंत पवारांच्या कथालेखनाची व त्यातील अस्सल अभिव्यक्तीची नोंद घ्यावी लागेल. 'कथा' या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे ते गंभीर लेखक होते. महानगरीय वास्तवाचे तेथील समाजजीवनसह अनेक चिंतनाचे विषय त्यांच्या कथालेखनातून समोर येतात. पवारांची कथा वाचकाला सतत जागी ठेवते. निखिलेश चित्रे या समीक्षकाने जयंत पवार यांच्या कथालेखनाबद्दल नोंदवलेले निरीक्षण महत्वाचे आहे. ते म्हणतात, "जयंत पवार यांच्या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दस्तऐवज आहेत. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रते सकट या कथा वाचकापुढे मांडतात. आजच्या मराठी साहित्यात पवारांची उपस्थिती आश्वासक आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारी आहे".

**संदर्भ:**

१. पवार जयंत, 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' लोकवाङ्मयगृह, मुंबई.२०१०

२. पवार जयंत, 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' लोकवाङ्मयगृह, मुंबई.२०१५

३. चित्रे निखिलेश, 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', (प्रस्तावना), लोकवाङ्मयगृह, मुंबई ,२०१०,पृ.१८

४. पवार जयंत, 'खेळ' (मुलाखत) - अंक २५ वा, जून २०१३, पृ.५९-६०.

५. काजरेकर गोविंद, १९८० नंतरची महानगरी कथा,'परिवर्तनाचा मुराळी', ऑगस्ट २०१७.

६. पाथरे रवींद्र, 'महानगरीय वास्तवाचा उभा-अडवा छेद',(लेख) दै. लोकसत्ता,रविवार दि.२२.०७.२०१८.

७. पवार जयंत, 'महानगरीय परात्मतेच्या अल्याड पल्याड'(लेख) दै.लोकसत्ता,रविवार दि.६.१.२०१९.

८. राजापुरे-तपास पुष्पलता, 'महानगरीय साहित्य-संकल्पना विचार', 'महानगरीय वास्तव: भारतीय कादंबऱ्या संदर्भात' (संपा.) डॉ.सुर्यकांत आजगावकर,ललित पब्लिकेशन, मुंबई, २०१९, पृ.२७.